# अंध मनुष्य आणि खाज

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित

काळोखाने त्याला पूर्णपणे वेढून टाकले होते. त्याने काही वेळा पापण्यांची उघडझाप केली—पण ते व्यर्थ ठरले, कारण त्याला माहीत होते की, त्याच्या दृष्टीत सुधारणा कधीही होणार नाही. शिवाय त्याच्या डोळ्यांमध्ये जी थोडीफार दृष्टी उरली होती, त्या आधारे त्याला पूर्णतः खात्री वाटत होती की, या खोलीत उजेडाचे कोणतेही साधन नाही, दिवाही नाही किंवा रुपेरी चंद्रकिरणे जिच्यातून आत येतील अशी खिडकीही नाही.

काहीच नव्हते, तो मनुष्य मिट्ट काळोखात होता. काळोख आणि—*सामसूम.* होते ते फक्त त्याचे विचार; उरात भरत असलेल्या धडकीच्या तुलनेत त्या विचारांचा गोंगाट वाढतच चालला आहे असे त्याला भासत होते. त्याने मनातल्या मनात आढावा घेतला की, तो तिथे त्या काळोख्या खोलीत कसा काय येऊन पोहोचला होता, जिथे खिडकीदेखील नव्हती आणि त्याच्या मदतीलाही कोणी नव्हते.

मजेशीर गोष्ट अशी होती की, ती थंडगार आणि भकास खोली एका महालाचा भाग होती. आणि तो महाल *भव्यदिव्य* होता—हवेशीर होता, सुंदर होता आणि अतिशय शांत व रमणीय अशा स्थानी होता जे स्थान चहूबाजूंनी हिरव्यागार टेकड्यांनी वेढलेले होते. तो मनुष्य यापूर्वी अशा जागेत कधीही राहिला नव्हता, जी सर्वाधिक आनंदमय, सर्वाधिक शानदार, सर्वाधिक शांत अशी होती; आणि ती जागा *त्याची* होती.

होय, त्याचे कुटुंबीय काही महिन्यांपूर्वीच या आलीशान निवासस्थानी राहायला आले होते आणि ते सगळे जण तिथे राहायला आल्यापासून तो माणूस त्या महालाच्या अनेक खोल्यांची तसेच त्या खोल्यांकडे जाण्याच्या मार्गांची माहिती करून घेत होता. समस्या ही होती की, हे त्याला एकट्याने आणि रात्री करायला आवडत असे, ज्या वेळी त्याची आधीच कमजोर असलेली दृष्टी आणखीनच कमजोर असे.

त्या संध्याकाळीही त्याने असेच केले, सगळे कुटुंब झोपी गेल्यावर तो गुपचुप निघाला. चालताचालता तो स्वतःशीच गुणगुणत होता, आपल्या स्मरणशक्तीवर आणि अंतःप्रेरणेवर भरवसा ठेवून, भिंतींवर लावलेल्या दिव्याच्या पात्रांना चाचपडून वाट शोधण्यासाठी त्याला जी काही मदद मिळाली त्यावर

विसंबून तो चालू लागला. सरतेशेवटी, तो जिन्याच्या अनेक पायऱ्या उतरत खाली आला आणि तळमजल्यावरील कॉरिडॉरमध्ये येऊन पोहोचला. जिकडे तोंड करून तो उभा होता, तिथे खुला दरवाजा आहे अशी त्याची समजूत झाली होती. त्याला हे माहीत नव्हते की, तो दरवाजा त्याला कुठे घेऊन जाईल आणि त्याला आतमधलेही काही दिसत नव्हते.

"कदाचित तू परत फिरायला हवे," एका हळुवार आवाजाने त्याला अंतरातून इशारा केला. तरीदेखील त्याने त्याचा विचार बदलला नाही. त्या खोलीविषयी असे काहीतरी होते—तिचे गूढ रहस्य, कदाचित इथे काहीतरी असेल अशी संभावना—ज्यामुळे आत जाण्याचा प्रबळ मोह आवरता न येणारा होता. आपल्या नकारात्मक विचारांना दूर सारून त्याने निर्धार केला व तो आत गेला.

तो या विचाराने थोडा पुढे चालला की, चालताचालता तो एखाद्या वस्तूवर किंवा कोणत्या तरी फर्निचरवर आदळेल आणि आपण कोठे आहोत याचा अंदाज त्याला घेता येईल; पण असे काहीही घडले नाही आणि काही क्षणांनंतर त्याला जाणवले की, तिथे थोडासा कुबट वास येतो आहे.

मग, त्याच्या पाठीमागून कुठूनतरी त्याला ऐकू आले. *टक्.* . . त्याच्या पोटात गोळा आला. निश्चितच, दरवाजा बंद होण्याचा आवाज होता तो.

तर, अशा प्रकारे तो इथे अडकून पडला होता, आंधळा आणि अंधारात, एका अज्ञात खोलीत, जिथून लगेच बाहेर पडण्याचा मार्ग नव्हता. त्याने आपली भीती कमी करण्यासाठी एक दीर्घ श्वास घेतला. त्याची भीती त्याच्या उरातून आता त्याच्या घशात येत होती, धास्तीने त्याचा घसाही कोरडा पडला. सुदैवाने त्याचे विचार काहीसे शांत झाले, जेणेकरून आता काय करावे याचा तो शांतचित्ताने विचार करू शकेल. 'एक योजना,' त्याने विचार केला. 'मला त्याचीच तर गरज आहे.'

एक दरवाजा तर *नक्कीच होता,* याचा अर्थ तिथून बाहेर पडण्याचा मार्ग तर होता. आणि ती एक बंदिस्त जागा होती, याचा सरळ अर्थ असा होता की, अखेरीस त्याला हा दरवाजा सापडू शकत होता. त्या काळ्याकुट्ट अंधारात आपले हात लांबवून, चाचपडत, चाचपडत तो पुढे चालू लागला . . .

*खट्.*

'सापडले,' या विचाराने त्याला समाधान वाटले. तो एका भिंतीला धडकला होता. आता इतकेच करायचे होते की, भिंतीला हात लावत, हळूहळू, भिंतीच्या कडेकडेने एकाच दिशेने, दार येईपर्यंत चालत राहणे. हे तर फारच सोपे वाटत होते.

त्याने एक पाऊल टाकले, मग दुसरे आणि मग पुढचे, मग आणखी पुढचे, त्याची चाचपडणारी बोटे थंडगार सिमेंटवरून फिरत होती. हे तर स्पष्टच होते की, ती खोली खूप मोठी होती—भिंत पार करायला अजून काही वेळ लागेल असे वाटत होते. अखेरीस त्याने भिंतीचा कोपरा गाठला जिथे त्या भिंतीलगत दुसरी भिंत होती आणि आता त्याला पुन्हा तीच गोष्ट पुन्हा करायची होती—भिंतीला हात लावत, हळूहळू चालत राहणे. दाराशी पोहोचण्याच्या आशेने आता तो या *नवीन* भिंतीला चाचपडत पुढे
चालू लागला.

याच तऱ्हेने तो काही वेळ तसाच पुढे जात राहिला. त्याला आशा होती—त्याला पूर्ण खात्री वाटत होती की, तो दरवाजाच्या नजीक जातो आहे. आता फार वेळ लागणार नाही.

त्याच वेळी त्याच्या लक्षात आले की, त्याच्या नाकावर काही चुरचुरते आहे. ती खाज होती, अचानक सुटलेली.

अनवधानाने त्याने आपले नाक जोराने आवळून घेतले आणि काय होते आहे त्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला, पण ती खाज वाढू लागली. . . वाढू लागली. . .*आणि अधिकच वाढू लागली.* न खाजवल्यामुळे बेचैन होऊन त्याच्या डोळ्यांतून पाणी येऊ लागले. त्याचे हात अजूनही भिंतीवरच होते; पण त्याचे लक्ष विचलित झाले. त्याच्या डोक्यात आता एकच विचार घोळत होता, तो म्हणजे त्याचे खाजणारे नाक. खाजेच्या त्या संवेदनेमुळे तो वैतागून गेला, त्याचे सगळे लक्ष तिकडेच होते; दुसरा कोणताही विचार तो करूच शकता नव्हता.

“मला खाजवावेच लागेल!” त्या रिकाम्या खोलीत हताश होऊन तो ओरडला.

आणि अखेरीस त्याने तेच केले. त्याने भिंतीवर ठेवलेले आपले दोन्ही हात उचलले [फक्त एकच हात उचलला असता तरी चालले असते; पण तो मनुष्य कोणताही विचार करण्याच्या मनःस्थितीतच नव्हता] आणि त्याने आपले नाक मनसोक्त खाजवले. आपण कुठे जात आहोत याचा विचार न करता, खाजवत-खाजवत तो चालतच राहिला.

नाक पुरेसे खाजवून झाल्यावर त्याला बरे वाटले, *“आहाहाऽऽ”* तो म्हणाला. त्याने आपले हात पुन्हा भिंतीवर ठेवले आणि आपला शोध पुन्हा सुरू केला.

आणखी काही वेळ गेला, किती ते त्याला कळले नाही. तो स्वतःलाच म्हणाला, “बस चालत राहा. पोहोचलोच असे समज.”

हा विचार मनात येताक्षणीच, खाज पुन्हा एकदा परतली. मात्र या वेळेला ती त्याच्या पोटरीवर होती. पुन्हा त्याने न खाजवण्याचा प्रयत्न केला, पण खाजवण्यापासून त्याने स्वतःला जेवढे रोखले, तेवढीच ती खाज आजूबाजूच्या त्वचेवर पसरू लागली. थोड्याच वेळात झाले असे की, आता खाज फक्त पोटरीवरच नव्हे, तर पूर्ण पायालाच खाज सुटली! न खाजवण्याचा त्याने पूर्ण प्रयत्न केला, त्याला वाटले की खाजवण्याचे रोखून या त्रासात जणू अनेक युगे लोटली; शेवटी त्याचा संयम सुटला. त्याने भिंतीवरून आपले दोन्ही हात उचलले आणि खाली वाकून, वेडापिसा झाल्याप्रमाणे तो आपले पाय खाजवू लागला.

अखेरीस खाज जेव्हा शमली, तेव्हा तो माणूस परत उठून उभा राहिला. त्याने मनाला येईल ती दिशा पकडली आणि पुन्हा भिंतीवर चाचपडू लागला. 'आता तर मी दरवाजा शोधूनच काढणार आहे' त्याने विचार केला.

अशा रीतीने तो मनुष्य फिरत राहिला आणि खाजवत राहिला. आधी इथे खाज सुटली. मग तिथे खाज सुटली. खाज कधी या बाजूला होती. तर कधी त्या बाजूला खाज सुटली. *इथे खाज. खाजवा. तिथे खाज. खाजवा.* यातच तो मनुष्य गोलगोल फिरत राहिला. अस्वस्थ होऊन त्याने आपल्या पायांनी जितक्या फेऱ्या मारल्या, तितकाच अस्वस्थ होऊन तो आपल्या कल्पनेनेही फेऱ्या मारत राहिला.

या सर्व गोंधळादरम्यान, जो त्या मनुष्याने स्वतःच स्वतःसाठी निर्माण केला होता, त्याच्या हे लक्षात येईना की, तो दर वेळी दरवाज्याच्या पुढून निघून जातो आहे, दरवाजा त्याच्या हाती लागतच नाही. खोलीमध्ये अनेक फेऱ्या मारतामारता असेच होई, जेव्हाजेव्हा त्याची बोटे दरवाजाच्या अगदी जवळ पोहोचत असत, तेव्हातेव्हा एक नवीनच खाज सुटत असे आणि त्याचे लक्ष विचलित होत असे.

बाहेर, टेकड्यांच्या मधून सूर्य उगवू लागला होता, त्या महालाला आपल्या उबदारपणाने आणि प्रकाशाने न्हाऊ घालू लागला होता; पण हेदेखील त्या मनुष्याला कधी कळूच शकणार नव्हते. तो थकला होता. तो भ्रांतचित्त झाला होता. नरकाप्रमाणे भासणाऱ्या त्या खोलीत तो अडकून पडला होता. तो वेडापिसा होऊन आपल्या हातांनी भिंती चाचपडत, चालत राहिला, फरफटत राहिला, खाज आली की तो खाजवत असे, पण पोहोचत मात्र कुठेही नसे.

*प्राचीन भारतातील ऋषीमुनी साधकांना, इंद्रियांचे गुलाम न होण्याचा सावधगिरीचा इशारा देतात म्हणजेच, साधकांनी आपल्या अंतरी उठणाऱ्या प्रत्येक वासनेला अविचारीपणे बळी पडू नये असा सावधानतेचा इशारा देतात. ऋषीमुनी म्हणतात की, अशा मनुष्याची अवस्था खाजवणाऱ्या त्या अंध माणसाहून फारशी निराळी नाही.*

*ही गोष्ट भारतीय वेदान्त तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांमध्ये कथन केलेल्या एका पौराणिक कथेपासून प्रेरित आहे.*

© २०२४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.